साप्ताहिक

# विश्वनायक

Email: vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - १२ ■ मंगळवार दि.१७ मार्च २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 12 ■ Tuesday Dt. 17 March 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# एसटी महामंडळाच्या बीड विभागात संबंधित अधिकाऱ्यांचे मॅनेजिंग रॅकेट.!

## समोरच्या पार्टीकडून मोठी रक्कम घ्यायची आणि महामंडळात मात्र कमी रक्कम नोंदवायची





**बीड । बिलाल शेख**

**राज्य परिवहन महामंडळाच्या बीड विभागात अपघात प्रकरणांमध्ये गंभीर आर्थिक अनियमिततेचा संशय निर्माण झाला असून काही अधिकाऱ्यांनी मॅनेजिंग रॅकेट उभे केल्याची चर्चा रंगू लागली आहे. एसटी बस आणि समोरच्या वाहनाचा अपघात झाल्यानंतर प्रकरण कायदेशीर मार्गाने न नेता जागच्या जागी तडजोड करून मोठी रक्कम उकळली जात असल्याचा आरोप पुढे येत आहे.**

माहितीनुसार, अपघातात समोरच्या वाहनधारकाची चूक असल्यास किंवा त्याच्याकडे आवश्यक कागदपत्रे नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला जातो. या तडजोडीच्या नावाखाली वाहनधारकाकडून मोठी रक्कम घेतली जाते. मात्र प्रत्यक्षात एसटी महामंडळाच्या अधिकृत नोंदीत अत्यंत कमी रक्कम दाखवली जाते. म्हणजेच समोरच्या पक्षाकडून त्यांच्या चुकीनुसार जास्तीची रक्कम घेऊन ती पूर्णपणे खात्यात न भरता कमी रक्कम दाखवण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. अशा प्रकारे अनेक अपघात प्रकरणांमधून लाखो रुपयांची वसुली करण्यात आल्याची चर्चा सध्या बीड विभागात जोर धरत आहे. विशेष म्हणजे, तडजोडीने मिटवलेल्या प्रकरणांमध्ये घेतलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम एसटीच्या अधिकृत रेकॉर्डमध्ये दाखवली गेल्याचेही काही प्रकरणांमधून समोर येत असल्याची माहिती आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ एखाद्या एकट्या कर्मचाऱ्यापुरता मर्यादित नसून काही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संगनमताने चालणारे रॅकेट असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित होत आहेत की,एसटी महामंडळाची अशी फसवणूक करणारे अधिकारी नेमके कोण?आतापर्यंत किती अपघात प्रकरणांमध्ये असा व्यवहार झाला?महामंडळाच्या खात्यात नोंद न झालेली रक्कम नेमकी कुठे गेली? या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### ‘सेटलमेंट’चा काळाबाजार; मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता

बीड विभागामध्ये सर्वच आगाराच्या अखत्यारीमध्ये असे प्रकार घडत असल्याची माहिती आहे. सेटलमेंट करण्याचा हा काळाबाजार महामंडळाचे वाहतूक निरीक्षक आणि संबंधित असलेले काही अधिकारी सोबतच कर्मचारी यांचे यामध्ये हात असल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत खोलवर जाऊन चौकशी केली तर यातून मोठा घोटाळा बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### एकीकडे महामंडळ तोट्यात अधिकारी मात्र मालामाल...

एस टी ही ग्रामीण महाराष्ट्राची नस म्हणून ओळखली जाते. आजही महामंडळाच्या बसेसवर ग्रामीण भाग पूर्णपणे अवलंबून आहे. म्हणूनच तोट्यात जरी असेल तरी महामंडळाची बस थांबणार नाही असे वारंवार बोलले जाते. एकीकडे महामंडळ तोट्यात असल्याचेही सांगण्यात येते तर दुसरीकडे अधिकारी मात्र अशा पद्धतीने पैसा कमावून मालामाल होत असल्याचे दिसत आहे.

# परळीच्या औ.वि.केंद्र वसाहतीत धाडसी चोरी

**परळी । प्रतिनिधी**



परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या शक्ती कुंज वसाहतीत असलेल्या अधिकार्यांच्या निवासस्थानी रुमचे बाहेरुन दार लावुन कपाटातील ४ लाख ९२ हजार ५१ रुपयांचे सोन्या- चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना १३ मार्च रोजी मध्यरात्रीनंतर घडली. याप्रकरणी संभाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परळी औष्णिक विजनिर्मिती केंद्रात कार्यरत असलेले अशोक गुंडु पाटिल हे शक्ती कुंज वसाहतीतील एफ ३६,४२५/४२६ या निवासस्थानी आपल्या कुटुंबासह राहतात. दि.१३ मार्च रोजी रात्री एका खोलीत आपल्या कुटुंबासह झोपले होते. त्यांचे वडिल गुंडु पाटील हे गावी गेल्याने त्यांची खोली रिकामी होती. अज्ञात चोरट्याने अशोक पाटील यांच्या खोलीचे दार बाहेरुन लावुन दुसर्या खोलीत असलेल्या कपाटातील साडेचार तोळे सोन्याचे तर ६५ ग्रॅम चांदीचे असे एकुण ४ लाख ९२ हजार ५१ रुपयांचे दागिने लंपास केले. याप्रकरणी संभाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोस्को गुन्हा मागे घेण्यासाठी पीडितेच्या घरावर तुफान दगडफेक!

## वाळू माफियांच्या दबावापोटी पेठ बीड पोलिसांनी सांगण्याप्रमाणे तक्रार न घेतल्याचा आरोप; पोलीस अधीक्षकांकडे धाव

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात गुन्हेगारांचे मनोबल इतके वाढले आहे की, एका १४ वर्षीय मुलीच्या पोस्को गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींनी भरदिवसा पीडितेच्या घरात घुसून तुफान दगडफेक केली. या हल्ल्यात पीडितेची आजी आणि काकु जखमी झाल्या असून घराचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, या गंभीर घटनेची तक्रार देण्यास पिडीतीची आई पेठ बीड पोलीस ठाण्यात गेल्यावर पेठ बीड पोलिसांनी 'वाळू माफियांच्या' दबावाखाली केवळ एनसी दाखल करून आरोपींना पाठीशी घातल्याचा धक्कादायक आरोप फिर्यादी यांनी केला आहे.




बिलाल मस्जिद परिसरातील रहिवासी जमीला शेख यांच्या १४ वर्षीय मुलीची आरोपी इरफान उस्मान शेख याने १० ऑक्टोबर २०२५ रोजी छेड काढली होती. याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल आहे. इरफानचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता, मात्र सध्या तो उच्च न्यायालयाच्या अंतरिम जामिनावर बाहेर आहे. हाच गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपी सातत्याने पीडित कुटुंबाला धमकावत होते.आज सकाळी १० वाजेच्या सुमारास सुरैय्या उस्मान शेख, हुसेन शेख, इरफान शेख आणि इमरान शेख या चौघांनी मिळून पीडितेच्या घरात प्रवेश केला. केस मागे घे, नाहीतर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत त्यांनी घराच्या दिशेने मोठ्या प्रमाणावर दगडफेक केली. या हल्ल्यात पीडितेच्या आजी पायाला आणि काकुच्या मांडीला गंभीर इजा झाली आहे.हा सर्व प्रकार आरोपींच्या स्वतःच्या आणि शेजारील सुलतान व युसुफ यांच्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पुराव्यानिशी तक्रार देऊनही पोलिसांनी योग्य कलमे लावून गुन्हा दाखल न केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. फिर्यादी जमीला शेख यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही तक्रार द्यायला गेलो असता, आरोपींना वाळू माफियांचे संरक्षण असल्याने पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे एफआयआर न घेता केवळ एनसी (छउठ छे. १२५/२०२६) नोंदवली. पोलिसांच्या या भूमिकेमुळे पीडित कुटुंबाच्या जीविताला आता मोठा धोका निर्माण झाला आहे. पिडीत कुटुंबाची मागणी:घरात घुसून मारहाण आणि दगडफेक करणाऱ्या आरोपींवर तात्काळ कठोर गुन्हा दाखल व्हावा. वाळू माफियांच्या दबावाखाली काम करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांचा सीडीआर तपासणी करून चौकशी व्हावी. पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण मिळावे.

# विवाहितेवर पाशवी अत्याचार करून रात्रभर चावडीच्या खांबाला बांधलं; नराधम जेरबंद!

**बीड/पिंपळनेर । प्रतिनिधी**

माणुसकीला काळिमा फासणारी आणि क्रूरतेचा कळस गाठणारी एक संतापजनक घटना बीड जिल्हयातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. एका नराधमाने घरात झोपलेल्या विवाहितेचे अपहरण करून तिच्यावर पाशवी अत्याचार केले आणि त्यानंतर तिला गावच्या चावडीवर खांबाला बांधून ठेवून पळ काढला. या अमानुष प्रकारामुळे संपूर्ण जिल्ह्यातून संताप व्यक्त होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित विवाहिता रात्री आपल्या घरात गाढ झोपलेली होती. उकाडा होत असल्याने घराचा दरवाजा उघडा होता, याचाच फायदा घेत वैभव पटेकर या नराधमाने मध्यरात्री घरात घुसून महिलेचे अपहरण केले. आरोपीने पीडितेला बळजबरीने नदीकाठी नेले. तिथे तिने प्रतिकार करण्याचा आणि आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता, नराधमाने तिचे तोंड दाबून तिच्यावर पाशवी अत्याचार केले. अत्याचाराने पीडिता बेशुद्ध पडली. मात्र, त्या नराधमाचा राक्षसीपणा इथेच थांबला नाही. त्याने बेशुद्ध अवस्थेतील पीडितेला पुन्हा गावात आणले आणि गावच्या सार्वजनिक चावडीवर असलेल्या खांबाला दोरीने बांधून ठेवले. हा अमानुष प्रकार रात्रभर कोणाच्याही लक्षात आला नाही. सकाळी जेव्हा गावकरी कामासाठी बाहेर पडले, तेव्हा त्यांना ही विवाहिता विवस्त्र आणि गंभीर अवस्थेत चावडीच्या खांबाला बांधलेली दिसली. हा भयानक प्रसंग पाहून गावकरी सुन्न झाले. त्यांनी तात्काळ तिची सुटका करत पोलिसांना पाचारण केले. घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर पोलीस आणि 'पिंक पथक' तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून वेगाने तपास चक्रे फिरवून आरोपी वैभव पटेकर याच्या मुसक्या आवळल्या आहेत. न्यायालयाने आरोपीला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!

भरवस्तीत एका महिलेवर असा अत्याचार होणे आणि तिला जाहीरपणे खांबाला बांधून ठेवणे, यावरून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला नसल्याचे दिसत आहे. या नराधमाला फाशीचीच शिक्षा व्हावी, अशी संतप्त मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली फसवणूक करणारास केले जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांनी जिल्ह्यातील फसवणूक करणाऱ्या इसमावर प्रभावी कारवाई करणे बाबतचे आदेश दिलेले आहेत. पोलीस स्टेशन अमळनेर येथे फिर्यादी नामे कविता विठ्ठल पवार वय ४० वर्षे व्यवसाय शेती राहणार पिंपळवंडी तालुका पाटोदा जिल्हा बीड यांचे फिर्यादवरून दिनांक १५/०२/२०२६ रोजी गुरन २१/२०२६ कलम ३१८ (४) बी एन एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्ह्याचा तपास आम्ही सपोनि सपकाळ करीत आहोत.



नमूद गुन्ह्यातील थोडक्यात हकीगत अशी की अनोळखी मोबाईल नंबर धारक ८८५७९८५००८ हा पोलीस स्टेशन अमळनेर हद्दीतील महिलांना फोन करून मी समाज कल्याण विभागाचा अधिकारी आहे, तुम्हाला लाडक्या बहीण योजने अंतर्गत भांड्याचे किट (शिलाई मशीन, पिठाची गिरणी वगैरे) मोफत देण्यात येणार आहे, असे खोटे बोलून त्यांच्याकडून ट्रान्सपोर्टचे भाडे म्हणून प्रत्येकी २२५०/- रु एवढी रक्कम टठ कोडवर मागवुन घेऊन त्यांची फसवणूक केलेली आहे.


सदर गुन्ह्याचे तपासात तांत्रीक विश्लेषण विभागाचे प्रमुख पो. उपनि. श्री. ओटे व पोकॉ. विकी सुरवसे यांच्या मदतीने आम्ही व पोकों योगेश बहिरवाळ असे आम्ही नमूद गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न केला असून त्याचे मोबाईल लोकेशन वरून त्यास दिनांक ०९/०३/२०२६ रोजी जालना शहरातून ताब्यात घेऊन नमूद करण्यात अटक केलेली असून सदर आरोपीचे नाव, गोरक्षनाथ नवनाथ पन्हाळकर वय ३५ वर्ष राहणार नाळवंडी तालुका पाटोदा जिल्हा बीड हल्ली मुक्काम तळेगाव बीड असे निष्पन्न झालेले आहे. सदर आरोपीस सध्या पोलीस कस्टडीनंतर आज रोजी मा. न्यायालयात हजर केले असता त्यास मा. न्यायालयाने न्यायालयीन कस्टडी मंजुर केली असुन त्याची जिल्हा कारागृह, बीड येथे रवानगी केली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ, पोउपनी औटे, विकी सुरवसे स्थानिक गुन्हे शाखा बीड, गुन्ह्याचे तपासामध्ये बारकाईने तांत्रीक तपास करण्यात आला असुन आरोपी हा वारंवार सिम कार्ड बदलत असल्याने व मोबाईल चालू बंद करत असल्याने तपास कामात अडचण निर्माण होत होती, तांत्रिक मदतीच्या सहाय्याने व अतिशय बारकाईने तपास करून त्यास दि ०९/०३/२०२६ रोजी जालना शहरातून ताब्यात घेण्यात आलेले आहे.

तसेच तपास कामामध्ये पोउपनी, कृष्णा चव्हाण, बिट अंमलदार पोलिस हवालदार बबन शिंदे, विलास माळी, भारत राठोड, सतीश तरटे, श्याम खाडे, संतोष कसाब, गणेश गोसावी, मारुती मेहेत्रे, शत्रुघ्न दिंडे, चालक युसूफ शेख पोलीस स्टेशन अंमळनेर यांनी मिळून केलेली आहे. अशा प्रकारचे फसवणुकीचे फोन कॉल आल्यास त्यास नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता अंमळनेर पोलीसांशी संपर्क साधावा असे जनतेस आवाहन करण्यात येत आहे.

# वाघोरा येथील ग्राम रोजगार सेवकाचा पैसे घेतानाचा व्हिडिओ व्हायरल

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील ग्राम रोजगार सेवकाचा पैसे घेतानाचा कथित व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये संबंधित ग्राम रोजगार सेवक एका व्यक्तीकडून रोख रक्कम स्वीकारताना दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे.



ग्राम रोजगार हमी योजनेशी संबंधित कामांमध्ये नागरिकांना विविध कागदपत्रे, मंजुरी व इतर प्रक्रियांसाठी कार्यालयीन स्तरावर ये-जा करावी लागते. अशा परिस्थितीत पैसे घेतल्याचा व्हिडिओ समोर आल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. काही ग्रामस्थांनी या प्रकारामुळे शासनाच्या योजनांची प्रतिमा मलिन होत असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान, हा व्हिडिओ नेमका कधीचा आहे, पैसे कोणत्या कारणासाठी घेतले गेले आणि संपूर्ण घटनेमागील पार्श्वभूमी काय आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र सोशल मीडियावर हा व्हिडिओ वेगाने पसरत असल्याने या प्रकरणाची चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे आणि दोषी आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन पारदर्शक चौकशी करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. या संदर्भात संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नसून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ऑल इंडिया पँथर सेनेकडून पोलीस अधिकाऱ्यावर गंभीर आरोप

## अमळनेर पोलीस स्टेशनमध्ये आरोपींसह वाढदिवस साजरा का केला : नितीन सोनवणे

**अमळनेर । प्रतिनिधी**

ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीड जिल्ह्यातील अमळनेर पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे दिलेल्या लिखित तक्रारीत म्हटले आहे की, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. भार्गव सुदाम सपकाळ यांनी शासकीय कार्यालयीन वेळेत आणि शासकीय गणवेशात वैयक्तिक वाढदिवस साजरा केला. या समारंभात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींसह अनेक व्यक्ती उपस्थित होत्या, ज्यामुळे शासकीय नियमांचे उल्लंघन झाले असल्याचा दावा आहे.



तक्रारीनुसार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी अमळनेर पोलीस स्टेशनमध्ये हा कार्यक्रम झाला. उपस्थित आरोपींमध्ये विजय दिलीप पोकळे (पोलीस स्टेशन तोफखाना, अहमदनगर, गु.क्र. १२८७/२०२४, कलम ६४(२), ३५१(२)(३), ३५६(२), ३०८(२) सह झजउडज कायदा २०१२ कलम ४, ६) आणि उद्धव रामभाऊ पवार (पोलीस स्टेशन बीड ग्रामीण, गु.क्र. १९/२०१५, कलम ३, ७ जीवन आवश्यक वस्तू अधिनियम) यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त वनरक्षक संदीप राठोड, अशोक विठ्ठल पवार, सुनिल बाळू आढाव, गोविंद श्रीपती गाडे, मा. सरपंच सुभाष बाबासाहेब पोकळे, नानासाहेब निवृती पवार, राजेंद्र शिवदास पोकळे, अमिर रफिक इनामदार, फिरोज शब्बीर बागवान, महेश रुद्रके, कृष्णा शिवाजी शेरकर, नितीन पोकळे यांसह अमळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी/अमलदार - पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, पोलीस हवालदार संदीप सांगळे, पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ, गोपीने शाखेचे पोलीस अमलदार श्याम खाडे, पोलीस कॉन्स्टेबल भारत राठोड, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर डोंगरे आणि होमगार्ड दिलीप घोसीर हे उपस्थित होते.ऑल इंडिया पँथर सेनेने म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम १९७९ नुसार शासकीय कार्यालयात वैयक्तिक समारंभ साजरे करणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. तरीही गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींसह अशा प्रकारे वाढदिवस साजरा केल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असून, अधिकाऱ्याचे अवैध संबंध आणि गाव गुंडांशी जवळीक असल्याचे स्पष्ट होते.तक्रारीत मागणी करण्यात आली आहे की, श्री. भार्गव सुदाम सपकाळ यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम १९७९ नुसार विभागीय चौकशी नेमावी आणि शिस्तभंगाची योग्य कारवाई करावी. अवैद्य धंदा करणाऱ्या लोकांशी संबंध असल्याचे दिसून येत आहे तसेच या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित इतर अधिकाऱ्यांवर/अमलदारांवरही आवश्यक कारवाई करावी.नितीन सोनवणे यांनी सांगितले की, महाराष्ट्र पोलीस दल उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखला जात असताना अशा वर्तनामुळे जनतेचा विश्वास डळमळीत होतो. म्हणून या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर कारवाई करावी, अशी विनंती पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.




# ऑपरेशन लोटसची का रंगली चर्चा?

राज्यसभेच्या ११ जागांसाठी तीन राज्यांत मतदान होत असताना ऑपरेशन लोटसचा कथित मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. ओडिशातील काँग्रेसच्या आठ आमदारांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी भाजपाने प्रत्येकी पाच कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप करण्यात आला. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी केलेल्या या आरोपांमुळे संपूर्ण देशभरात एकच खळबळ उडाली. त्यांच्या या आरोपांची दखल घेऊन पोलिसांनी आतापर्यंत पाच संशयितांना अटक केली. त्यातील एक संशयित हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असल्याची चर्चा रंगली. यादरम्यान काँग्रेसने केलेले सर्व आरोप भाजपाच्या नेत्यांनी फेटाळून लावले.१८ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणुकीची घोषणा केली होती. त्यामध्ये महाराष्ट्रासह ओडिशा, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणाचा समावेश होता. या १० पैकी तब्बल सात राज्यातील ३७ उमेदवार बिनविरोध निवडून आले. उर्वरित बिहार, ओडिशा आणि हरियाणामधील ११ जागांसाठी चौदा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यासाठी सोमवारी (१६ मार्च) मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. यादरम्यान कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी भाजपावर केलेल्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. राज्यसभा निवडणुकीतील घोडेबाजार टाळण्यासाठी काँग्रेसने ओडिशातील आपल्या १४ पैकी आठ आमदारांना बेंगळुरू येथील एका हॉटेलात ठेवले होते. शिवकुमार यांनी केलेल्या आरोपानुसार, रविवारी काही व्यक्ती हॉटेलात शिरले आणि त्यांनी आमदारांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी दबावतंत्राचा वापर करण्यास सुरुवात केली. इतक्यावरच न थांबता या व्यक्तींनी काँग्रेसच्या आमदारांना क्रॉस व्होटिंगसाठी प्रत्येकी पाच कोटी रुपयांची ऑफरही दिली. उपमुख्यमंत्र्यांनी भरपत्रकार परिषदेत केलेल्या या खळबळजनक आरोपांची पोलिसांनी गंभीर दखल घेतली. डी. के. शिवकुमार यांनी केलेल्या आरोपानंतर पोलिसांनी आतापर्यंत पाच संशयितांना अटक केली आहे. त्यातील एक संशयित हा ओडिशातील भाजपाचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले जात आहे. त्या संदर्भात कोराटपूरचे खासदार सप्तगिरी शंकर उलाका यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. अटक करण्यात आलेले आरोपी ओडिशाच्या राउरकेला येथील रहिवासी आहेत. त्यांच्याकडे कोरे चेक सापडले असून चौकशीत त्यांनी भाजपा समर्थित अपक्ष उमेदवार दिलीप राय यांचे नाव घेतल्याची माहिती आहे. काँग्रेसचे आमदार ज्या हॉटेलमध्ये थांबले होते, ते हॉटेलदेखील दिलीप राय यांच्याच मालकीचे असल्याचा आरोप काँग्रेसच्या खासदाराने केला आहे. या आरोपांमुळे देशातील राजकीय वातावरण चांगलेच ढळवून निघाले आहे. काँग्रेसने केलेले सर्व आरोप भाजपाच्या नेत्यांनी फेटाळून लावले आहेत. भाजपाने या आरोपांना केवळ राजकीय प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. राज्यसभेत पराभव दिसत असल्याने काँग्रेसचे नेते असे निराधार आरोप करत असल्याचे भाजपाचे म्हणणे आहे. त्यांनी डी. के. शिवकुमार यांना या आरोपांचे ठोस पुरावे सादर करण्याचे आव्हान दिले आहे. केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी ऑपरेशन लोटसचा बागुलबुवा केला जात असल्याची टीका भाजपाने केली आहे. काँग्रेसला आपल्या आमदारांवर विश्वास नसल्यामुळेच त्यांना हॉटेलात ठेवल्याचा टोला भाजपाने लगावला आहे. यादरम्यान राज्यसभेच्या ११ जागांसाठी चुरस वाढल्याने दोन्ही काँग्रेस व भाजपाचे नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसून येत आहेत. राज्यसभेच्या ११ जागांपैकी बिहारमध्ये पाच, ओडिशातील प्रत्येकी चार आणि हरियाणातील दोन जागांसाठी निवडणूक होत आहे. बिहार विधानसभेत २४३ आमदारांचे संख्याबळ असून त्यातील तब्बल २०२ आमदार भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे आहेत; तर विरोधकांच्या महाआघाडीकडे केवळ ३५ आमदार आहेत. या निवडणुकीत भाजपा व त्यांच्या मित्रपक्षाच्या चार उमेदवारांचा विजय निश्चित मानला जात आहे. पाचवी जागा मिळण्यासाठी त्यांना तीन आमदारांचा पाठिंबा लागणार आहे. राज्यसभेची एक जागा आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी महाआघाडीला सहा आमदारांच्या पाठिंब्याची गरज आहे, त्यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. ओडिशातील राज्यसभेच्या चार पैकी दोन जागांवर भाजपाचा विजय निश्चित मानला जात आहे, तर बिजु जनता दल आणि काँग्रेस समर्थित माकपला प्रत्येकी एक जागा मिळण्याची शक्यता आहे. ओडिशामध्ये विधासभेत एकूण १४७ आमदारांचे संख्याबळ आहे. क्रॉस व्होटिंगमुळे येथे भाजपाचे तीन उमेदवार निवडून येऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दुसरीकडे हरियाणात राज्यसभेच्या दोन जागा रिक्त असून त्यासाठी तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हरियाणा विधानसभेत एकूण ९० आमदारांचे संख्याबळ आहे, त्यापैकी भाजपाकडे ४८ आणि काँग्रेसकडे ३७ आमदार आहेत. त्याशिवाय आयएनएलडीकडे दोन आणि तीन आमदार अपक्ष म्हणून निवडून आलेले आहेत. राज्यसभेची निवडणूक जिंकण्यासाठी ३१ मते आवश्यक असल्यामुळे भाजपा व काँग्रेसच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा विजय निश्चित मानला जात आहे. मात्र, क्रॉस व्होटिंग झाल्यास या समीकरणात बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# मतदारांनी २००२ च्या यादीशी लिंक प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी

## मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन; सभापती निजाम शेख यांची नागरिकांना सूचना

**बीड । प्रतिनिधी**

मतदार यादी अचूक आणि अद्ययावत राहावी तसेच आगामी निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारांची माहिती २००२ मधील मतदार यादीशी लिंक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदारांनी आपल्या प्रभागातील बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांच्याशी तात्काळ संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन नगरपरिषदेचे सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

मतदार यादीतील माहिती योग्य व अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा मतदार यादीत पत्ता बदल, नावातील चुका किंवा प्रभागातील बदल यामुळे मतदानाच्या वेळी मतदारांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा अडचणी टाळण्यासाठी नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन मतदार यादीतील माहिती तपासून घ्यावी आणि आवश्यक असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.



प्रशासनाच्या वतीने सध्या मतदार यादी अद्ययावत करण्याचे तसेच मतदारांचे मॅपिंग करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील बीएलओ यांची भेट घेऊन मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर माहिती योग्य आहे का याची खात्री करून घ्यावी. आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण केल्यास भविष्यात मतदानाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, असेही सभापती निजाम शेख यांनी नमूद केले. विशेषतः ज्या नागरिकांची नावे २००२ मधील मतदार यादीत नोंद होती त्यांनी आपली माहिती तपासणे आवश्यक आहे. विवाहित महिलांनी आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक शोधणे गरजेचे आहे. यामुळे माहिती पडताळणी प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

नागरिकांना मतदार यादीतील माहिती शोधण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी खालील संकेतस्थळावर जाऊन राज्य, जिल्हा, मतदारसंघ, मतदाराचे नाव आणि कॅप्चा भरून आपली माहिती तपासू शकतात. संकेतस्थळ https://voters.eci.gov.in/searchInSIR मतदारांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण केल्यास मतदान प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तसेच मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक राहण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

**मतदारांनी काय करावे?**

- मतदार संघाचे नाव व क्रमांक तपासणे
- मतदार यादीतील भाग क्रमांक शोधणे
- अनुक्रमांक पडताळून पाहणे

**आवश्यक कागदपत्रे**

- आधार कार्ड
- मोबाईल क्रमांक
- नुकताच काढलेला पासपोर्ट फोटो

# मागणीची दखल! वनविभागाने कृत्रिम पाणवठे पाण्याने भरले

## डॉ. गणेश ढवळे यांच्या पाठपुराव्यानंतर टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी व सोमनाथवाडी परिसरातील वनक्षेत्रात वनविभागाने उभारलेले कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीवांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. पाण्याच्या शोधात हरीण व काळवीट यांसारखे वन्यप्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत असल्याने कुत्र्यांच्या हल्ल्यात किंवा वाहनांच्या धडकेत जखमी होण्याच्या तसेच मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली होती.

लिंबागणेश परिसरात गेल्या महिनाभरात एका काळवीटाचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुसरे एक काळवीट गंभीर जखमी अवस्थेत आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी संबंधित कृत्रिम पाणवठ्यांना भेट देऊन पाहणी केली असता ते पूर्णपणे कोरडे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमितपणे कृत्रिम पाणवठ्यांमध्ये पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. या संदर्भातील बातम्या विविध दैनिकांमधून प्रसिद्ध झाल्यानंतर वनविभागाने याची दखल घेतली.



वनविभागाचे अधिकारी महेश मेटे यांनी तत्काळ पावले उचलत संबंधित कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यामुळे वन्यजीवांना मोठा दिलासा मिळाला आहे. उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव घ्यावी लागू नये तसेच अपघातांमुळे त्यांचे जीवितहानी टळावी यासाठी वनविभागाने उन्हाळाभर कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, अशी अपेक्षा डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# प्रमिला देवी पाटील कला विज्ञान महाविद्यालय सावित्रीबाई फुलें पुण्यतिथी साजरा



**बीड । प्रतिनिधी**

प्रमिला देवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य ढास.डी.के. उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शंकर वाघमारे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणार्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. मुजावर एस.टी. बोलत असताना त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले. तसेच भारतीय संस्कृतीमध्ये शिक्षणाच्या प्रणेत्या म्हणून सावित्रीबाई फुले यांचे नाव आदरणीय असून महिला आज आपल्याला सर्व क्षेत्रांमध्ये पुढे जाताना दिसत आहेत. याचे सर्व श्रेय एकूणच सावित्रीबाई फुले यांना आहे. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आहेत ज्यांनी समाजातील तत्कालीन रुढी परंपरांना विरोध करत चुल आणि मुल यांच्या पलीकडे आपले पती महात्मा फुले यांच्या सहकार्याने मुलींना शिक्षण देण्याचे कार्य केले असे प्रतिपादन केले.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मराठी विभागचे प्रा.डॉ. अंकुश काळे यांनी शिक्षण हे सर्व विकासाचे साधन असून आपल्या आयुष्याचे खरे ध्येय शिक्षणाच्या माध्यमातूनच आपल्याला मिळू शकते असे प्रतिपादन केले.

आजचा दिवस हा अर्ध्या जगाला म्हणजेच महिलांना शिक्षणाची दारे उघडी करणारा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी याप्रसंगी मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे व शिक्षण हे समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचवले पाहिजे. शिक्षण हाच समाजाच्या विकासाचा व समाजातील घटकांच्या विकासाचा गाभा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एनएसएस विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक रामरूले डि.के. यांनी केले.

# गडकोट विकास महामंडळ मागणीवर आश्वासन; किसन पाटील यांचे उपोषण स्थगित

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वराज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले आमरण उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. जागर प्रतिष्ठान चे अध्यक्ष किसन प्रभाकर चव्हाण यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनंतर उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. गेल्या काही दिवसांपासून तुळजापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक



तुळजापूर येथे गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी हे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाला राज्यभरातून शिवप्रेमी व विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत होता. दरम्यान, शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीवर शासनाने लवकर निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाईल. गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या इतिहासाची जिवंत साक्ष असल्याने त्यांचे संवर्धन करणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी यावेळी नमूद केले.

# सभापती उडाण यांच्या इफ्तार पार्टीला अलोट गर्दी



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बार्शी नाका परिसरात नगरपालिका सभापती संजय उडाण यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला हिंदू मुस्लिम समाजातील अलोट गर्दी उसळली होती. बीड शहरातील बार्शी नाका परिसर हा नावाजलेला आहे. या भागात विविध जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. सर्व समाज एकत्र येऊन सण उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करून राष्ट्रीय एकात्मता दाखविण्याचे काम या भागात करण्यात येते. या भागाचे नेतृत्व गत अनेक दिवसापासून नगरसेवक संजय उडान करत आहेत.

सध्या ते नगरपालिकेचे बांधकाम सभापती असून सामाजिक कार्यात त्यांचा मोठा पुढाकार असतो. विविध समाजाची लोक या भागात राहत असल्याने सर्व समाजाला सोबत घेऊन चालण्याची वृत्ती त्यांची असल्यामुळे ते गत अनेक दिवसांपासून या भागात हे नेतृत्व करतात. त्यांनी दि. १३ मार्च रोजी सायंकाळी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला शहरातील तसेच बार्शी नाका परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात हिंदू मुस्लिम समाजासह इतर समाजाचेही नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रमजान महिन्यात शहरात भेसळयुक्त दूध, स्थानिक खाद्य सुरक्षा अधिकारी झोपले का ? : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातच नव्हे, तर पूर्ण शहरात काही ठिकाणी भेसळयुक्त दूध येत आहे, ज्यांच्याकडे एक दोन म्हशी आहे ते पण १५० ते २०० लिटर दूध विक्रीला आणत आहे. शहरात बऱ्याच ठिकाणी पुड्या मार्फत दूध विकले जात आहे. पण हे दूध म्हशी, गाय, शेळीचे नसून पावडरयुक्त दूध विकले जात आहे. त्यामुळे माणसावर बऱ्याच प्रकारचे आजार होत आहे. जसे की पोटाचे रोग, एलर्जी, किडनी समस्या, प्रोटीन कमी होणे, कॅल्शियम कमी होणे, विटामिन कमी होणे, बाळाच्या हाडाची समस्या, बाळाच्या दाताची समस्या, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कॅन्सर, हृदय समस्या, किडनी फेल अशा बरेच रोगाला कारणीभूत हे भेसळयुक्त दूध आहे. आणि यासाठी स्थानिक खाद्य पुरवठा विभाग यांनी लक्ष द्यावे, तसेच जे कोणी भेसळयुक्त दूध विकत असेल त्यांच्यावर योग्य ती कारवाई झालीच पाहिजे. हीच जनतेची मागणी आहे.



# सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन ईद आधी देण्यात यावे : सलीम अध्यक्ष, ए.एस. गोलू

**बीड । प्रतिनिधी**

ईद हे सण जवळ आले असून या सणाच्या निमित्ताने सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन वेळेवर मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन ईद आधी देण्यात यावे अशी मागणी सलीम अध्यक्ष ए एस गोलू हे करत आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन ईद अधि मिळाल्यास त्यांना त्यांच्या





कुटुंबाला सणांच्या निमित्ताने आवश्यक असलेल्या वस्तू खरेदी करण्यास मदत होईल. व सणानिमित्ताने त्यांना मदत होईल. ईद हे सण २१ मार्च ला आहे . येत्यात दोन ते तीन दिवसात जर वेतन देण्यात आली तर सर्व शासकीय मुस्लिम कर्मचाऱ्यांना त्यांच्या व कुटुंबांचे खरेदीसाठी त्यांना त्याचा फायदा होईल सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना येत्या दोन ते तीन दिवसात पगार वेतन देण्यात यावे यावा, अशी मागणी सलीम अध्यक्ष, ए एस गोलू यांनी केली आहे.



मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या सदस्य पदी संभाजी भैय्या सुर्वे निवड झाल्याबद्दल सत्कार करताना केंद्र प्रमुख हकीम मनियार सर, स्व अमोल भैय्या गलधर युवा मंच चे युवा नेते मोहम्मद अझरुद्दीन, ए एस गोलू, शेख वसीम इ. उपस्थीत होते.

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे राज्यस्तरीय व्याख्यानाचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे पीएम श्री योजनेअंतर्गत राष्ट्रीय आविष्कार अभियान अंतर्गत राज्यस्तरीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रख्यात व्याख्याते डॉ. प्रकाशजी राधेश्याम का यांनी अंतराळातील तंत्रज्ञान आणि पृथ्वीचा अभ्यास : सुदूर संवेदना व जीआयएसची ओळख या विषयावर शालेय विद्यार्थ्यांना कृतीयुक्त मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी अंतराळातील मानवनिर्मित उपग्रह, त्यांचे कार्य, भविष्यातील गरज तसेच कृषी संशोधन क्षेत्रातील त्यांचा होणारा उपयोग याबाबत सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाची ओळख करून देताना त्यांनी सुदूर संवेदना (रिमोट सेन्सींग) आणि जीआयएस (जीआयस) तंत्रज्ञानाचे महत्त्वही सोप्या भाषेत स्पष्ट केले.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लाड सर होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. पायके सर, श्री. आघाव सर, श्रीमती खाडे मॅडम, श्रीमती मुंढे मॅडम, श्री. डोंगर सर, श्री. मेजर साळुंके, श्री. साबळे सर, श्रीमती म्हेत्रे मॅडम, श्रीमती मुळे मॅडम, श्रीमती जाधव मॅडम, श्रीमती वाकचौरे मॅडम, श्रीमती जगताप मॅडम, श्रीमती सांगळे मॅडम व श्रीमती हंगे मॅडम यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मुंढे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती रंजना म्हेत्रे यांनी केले.

# वृक्ष लागवडीच्या नावाखाली दरवर्षी मोठा निधी खर्च; मात्र कागदावर दिसणारी लाखो झाडे प्रत्यक्षात जमिनीवर आहेत कुठे?

## बीड जिल्ह्यातील वृक्ष लागवड, संवर्धनासाठी किती खर्च झाला हे अधिकाऱ्यांना सांगता येईना?

■ पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह; दाल में कुछ काला ?

■ इंडियन बुक आफ रेकॉर्ड विजेते विवेक जान्सन यांनी माहिती द्यावी : डॉ.गणेश ढवळे

■ अकरा तालुक्यांकडे अर्ज फिरवून अधिकाऱ्यांनी हात झटकणे योग्य का?



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागाने लागवड आणि संवर्धनासाठी खर्च केलेल्या कोट्यवधींच्या निधीबाबत विचारलेल्या प्रश्नांना बगल देण्यास सुरुवात केली आहे. माहितीच्या अधिकारात विचारलेल्या माहितीवर थेट उत्तर देण्याऐवजी, मुख्य जन माहिती अधिकाऱ्यांनी हा अर्ज अकरा तालुक्यांकडे हस्तांतरित करून आपली जबाबदारी झटकल्याचे समोर आले आहे. एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड दाखवुन इंडीयन बुक आफ रेकॉर्ड पुरस्कार विजेते जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी माहिती द्यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बीड येथील पर्यावरण प्रेमी वृक्षप्रेमीने माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सामाजिक वनीकरण विभाग, बीड यांच्याकडे सन २०२५ या वर्षातील निधीच्या विनियोगाबाबत सविस्तर माहिती मागितली होती. यामध्ये प्रामुख्याने वर्षभरात प्राप्त झालेला एकूण निधी व झालेला खर्च, तालुकावार व स्थळनिहाय लागवड केलेल्या झाडांची यादी, सद्यस्थितीत जिवंत असलेल्या झाडांची नेमकी संख्या, मजुरी, खते आणि प्रसिद्धीवर झालेला लेखापरीक्षित खर्च आदी मुद्यांचा समावेश आहे. मात्र सदरील माहिती देण्याऐवजी विभागाकडून 'टोलवाटोलवी' होत असल्याचे दिसून येते. या अर्जावर उत्तर देताना जिल्हा कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल यांनी माहिती उपलब्ध करून देण्याऐवजी, ती माहिती 'योजना कक्ष' आणि जिल्ह्यातील अकराही तालुक्यांच्या (बीड, गेवराई, माजलगाव, आष्टी, परळी इ.) वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित केली आहे. विशेष म्हणजे, ज्या माहितीचा एकत्रित गोषवारा जिल्हा कार्यालयाकडे असणे अपेक्षित आहे, त्यासाठी आता प्रत्येक तालुक्याच्या उंबरठ्यावर चकरा मारण्याची वेळ अर्जदारावर आणली जात आहे.

### पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह; दाल में कुछ काला? : डॉ.गणेश ढवळे



वृक्ष लागवडीच्या नावाखाली दरवर्षी मोठा निधी खर्च केला जातो, मात्र कागदावर दिसणारी लाखो झाडे प्रत्यक्षात जमिनीवर कुठे आहेत? असा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. जेव्हा या खर्चाचा 'ऑडिट रिपोर्ट' आणि जिवंत झाडांची आकडेवारी मागितली जाते, तेव्हा माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा अर्ज इतरत्र वर्ग करणे, यावरून प्रशासकीय पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एकीकडे शासन पारदर्शक कारभाराच्या गप्पा मारते, तर दुसरीकडे जिल्हास्तरावर माहिती उपलब्ध असताना ती तालुका स्तरावर वर्ग करून वेळकाढूपणा केला जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. हा प्रकार माहिती अधिकार कायद्याच्या मूळ उद्देशाला हरताळ फासणारा आहे. अशी जोरदार चर्चा आहे. आता अकरा तालुक्यांचे वनपरिक्षेत्र अधिकारी ही माहिती वेळेत देतात की पुन्हा 'कागदी घोडे' नाचवून अर्जदाराची बोळवण करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.त्यामुळे इंडियन बुक आफ रेकॉर्ड विजेते जिल्हाधिकारी यांनी याची माहिती द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# घळाटवाडीत मेंढपाळांवर हल्ला; जखमी बिटे कुटुंबीयांची दत्ता वाकसेंनी घेतली भेट

### दत्ता वाकसे यांची अप्पर पोलीस अधीक्षकांकडे धाव; दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन

वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथे पुसरा येथील मेंढपाळांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेत बिटे कुटुंबातील दोन तरूण सदस्य जखमी झाले असून त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने या घटनेमुळे धनगर समाजासह मेंढपाळ बांधवांत संतापाची लाट पसरली असून सोशल मीडियातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळतात मला ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष दत्ता वाकसे जखमींची भेट घेऊन दिलासा दिला आहे.

मंगळवार दि. १० मार्च रोजी वडवणी तालुक्यातील पुसरा येथील मेंढपाळ लहु बीटे, बाबा बीटे हे मेंढ्या चारण्यासाठी घेऊन माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथे गेले होते. बांधावरून जाण्याच्या कारणावरून समाजकंटकांनी लहु बीटे व बाबा बीटे या दोन भावांना काठीने निर्दयीपणे मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र तिव्र पडसाद उमटले आहेत. घडलेल्या प्रकाराची माहिती मिळताच मल्हार ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी बीड जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमी बिटे



कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जखमींची प्रकृती विचारपूस करत संपूर्ण घटनेची माहिती जाणून घेतली. मेंढपाळ समाजावर झालेल्या या हल्ल्याचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. यानंतर दत्ता वाकसे यांनी बीड जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची भेट घेऊन या प्रकरणी निवेदन सादर केले. मेंढपाळांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेतील दोषींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली. समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या अशा घटनांवर प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावर अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

पोलिस प्रशासन या घटनेचा तपास करत असून दोषींना वाचवले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या घटनेनंतर मेंढपाळ समाजामध्ये संतापाची लाट पसरली असून जखमींची भेट घेण्यासाठी समाजातील मेंढपाळ बांधव तसेच महिलाही मोठ्या संख्येने जिल्हा रुग्णालयात उपस्थित होत्या. समाजाच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून दोषींवर कठोर कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# हिंगणी खुर्दच्या ५० ते ६० कुटुंबांना रहदारीचा रस्ताच नाही

### तहसीलदार बीड यांनी रस्ता खुला करून देण्याची ग्रामस्थांची मागणी

**रस्ताच नसल्याने ५० ते ६० कुटुंब जगत आहेत बंदिवासात**


बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा परिसरातील मौजे हिंगणी (खुर्द) या गावाचे ५० ते ६० कुटुंब सध्या हवालदिल झाले आहे आहेत. कारण या कुटुंबाची वस्ती ज्या ठिकाणी आहे त्या वस्तीला जाण्यासाठी जो रहदारीचा मुख्य रस्ता होता तो रस्ताच गट क्रमांक ४०४ मधील शेतकऱ्याने अडवला आहे. आणी रस्ता अडवल्यामुळे हे ५० ते ६० कुटूंब सध्या एकाद्या बंधीस्त जागेत कैद केल्यागत कैद आहेत. कारण यांचा येण्याजाण्यासाठीचा रस्ताच गट क्रमांक ४०४ मध्ये शेत असणाऱ्या शेतकऱ्यानी बंद केल्यामुळे या ५० ते ६०कुटुंबाना बंदिस्त जागेत आणी बंदिस्त अवस्थेत राहावे लागत आहे.



महाराष्ट्र शासनाने शेती संबंधित बांध रस्ते, वस्त्यावर जाणारे रस्ते, पांदन रस्ते, सार्वजनिक वाद निर्माण असलेले रस्ते खुले करण्याची योजना आणली आहे. मात्र मौजे हिंगणी खुर्दच्या या गट क्रमांक ४०४ मधील रस्त्या बाबतीत ही योजना हवेतच विरून गेली की काय? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कारण या ५० ते ६० कुटुबानीं या रस्तायासाठी बीडचे कर्तव्यदक्ष तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके यांना या आधी दोन तिन वेळा अर्ज, निवेदने, प्रत्यक्ष भेटी गाठी, विनंतीअर्ज केले आहेत की, आमचा रहदारीचा हा मुख्य रस्ता असून तो ४०४ गट क्रमांक मधील शेतकऱ्याने अडवला आहे आणी हा अडवलेला रस्ता आम्हास खुला करून देण्यात यावा. मात्र आजपर्यंत बीड तालुक्यातील शेकडो रस्त्याचे वाद मिटवून, शेत रस्ते, पानंदन रस्ते, गाव रस्ते, वस्तीवर जाणारे रस्ते यांचे वाद मिटवून शासकीय स्तरावर ते रस्ते खुले करणाऱ्या बीडचे मा. तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके यांना मात्र हिंगणी खुर्द चा हा रस्ता अजून खुला करता आला नाही ही शोकांतिका आहे.

आम्ही बीड तालुक्यातील रहिवाशी आहोत त्यामुळे आम्ही कर्तव्यदक्ष असणाऱ्या तहसीलदार साहेबानं कडे वारंवार विविध मार्गाने, आम्हाला आमचा हा रस्ता खुला करून देण्याची मागणी करत आहोत.तरी मेहरबान तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके साहेबांनी आमच्या या प्रश्नांकडे प्रकर्षाने लक्ष घालून आम्हाला आमचा गट क्रमांक ४०४ मधील हा रहदारीचा रस्ता मोकळा करून देऊन आमच्या या ५० ते ६० कुटुंबावर मेहरबानी करावी अशी विनंती आणी मागणी मोजे हिंगणी खुर्द येथील विनायक वसंत तांदळे यांच्यासह ५० ते ६० कुटुंबातील सदस्यांनी केली आहे.



नेकनूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्तव्यदक्ष अधिकारी डॉ. कैलासजी खाकरे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीचे माजी संचालक श्रीमंत सोनवणे, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, भवानी ग्रुपचे अध्यक्ष सुधाकर गुंजाळ, विठ्ठल झोडगे पाटील सह आदी.

# माजलगाव नगरीचे नगरसेवक सदानंद प्रधान यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषदेचे नवनिर्वाचित युवा नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शिक्षण, सेवा आणि समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्यात आले. या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील २९५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना वह्या, पेन,

पेन्सिल आदी साहित्य देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच सेवार्थ शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुकबधीर निवासी शाळेत



विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. सोबतच महिला सफाई कामगारांना साड्या वाटप करण्यात आल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. याचबरोबर समाजहिताचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. या रक्तदानातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस अशा उपक्रमांद्वारे साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्ते व नागरिकांनी सहकार्य केले.

# पाटोदा तालुक्यात घरगुती गॅसची अडवणूक करणाऱ्या एजन्सींवर तात्काळ कारवाई करा : संतोष कवठेकर

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडर मुबलक प्रमाणात उपलब्ध असतानाही काही गॅस एजन्सीकडून नागरिकांना वेळेवर गॅस देण्यात अडचणी निर्माण केल्या जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. घरगुती गॅस उपलब्ध असतानाही कृत्रिम टंचाई निर्माण करून ग्राहकांची अडवणूक केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते संतोष कवठेकर यांनी प्रशासनाकडे लक्ष वेधत संबंधित गॅस एजन्सींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी सांगितले की, घरगुती वापरासाठी असलेला गॅस नागरिकांना सहज उपलब्ध व्हावा, ही एजन्सीची जबाबदारी आहे. मात्र काही ठिकाणी सिलेंडर उपलब्ध असूनही ग्राहकांना विलंब केला जातो किंवा विविध कारणे सांगून अडवणूक केली जाते.यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून दोषी एजन्सींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी संतोष कवठेकर यांनी केली आहे. तसेच पाटोदा तालुक्यातील सर्व गॅस एजन्सींची तपासणी करून नागरिकांना घरगुती गॅस सुरळीतपणे मिळावा, यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# राज्यस्तरीय कलाउत्सवमध्ये सेंट झेवियर्स स्कूलचे यश



बीड । प्रतिनिधी

यशवंत कला महाविद्यालय छत्रपति संभाजी नगर कला उत्सव स्पर्धेत बीड सेंट झेवियरर्स स्कूल च्या विद्यार्थीनी आणि कला शिक्षीका यश संपादन केले आहे. विविध वयोगटात शाळेच्या विद्यार्थीनी सहभाग नोदवीला आहे. सेट झेंवियर्स स्कूल बीड च्या शिक्षीका कु. संध्या भास्कर वाघमारे यांना दि.१०/०३/२०२६ छत्रपती संभाजीनगर कला उत्सव राज्यस्तरीय कला प्रदर्शनात गुणवत्ता पारितोषिक व द्वितीय पारितोशीक प्राप्त झाले आहे.

तसेच त्याच्या पाच विद्यार्थचे देखील चित्र प्रदर्शनात लागले आहे व त्यानी चंपावती महोत्सव मध्ये देखील गीत गायन, नृत्य कला, चित्रकला या स्पर्धेत त्यानी सेंट झेवियर्स स्कूल ला घवघवीत यश प्राप्त करूण दिले आहे. शाळेचे प्राचार्य प्रिंसिपल फादर जेम्स थोरात यानी कौतुक केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या समन्वयक भाग्यश्री मॅडम, सुषमा मॅडम, लिजमा मॅडम, कोमल मॅडम, चंदा मॅडम, घोलप सर, पंकज सर व इतर सह शिक्षिका यांनी पूढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जितेंद्र सकपाळ यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मुंबई महानगर कार्याध्यक्ष शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पदी नियुक्ती



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार तसेच कक्ष प्रमुख उपमुख्यमंत्री सहायता निधी मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाने जितेंद्र दगडू (दादा) सकपाळ यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मुंबई महानगर कार्याध्यक्ष शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.

सदर नियुक्ती शिवसेना पक्षाचे मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हस्ते पत्र देऊन पदभार देण्यात आला. त्याप्रसंगी वैद्यकीय मदत कक्षाचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष श्री.रामहरी राऊत सर, कक्ष प्रमुख पनवेल विधानसभा शिवसेना वैधकीय मदत कक्ष व धर्मवीर वाहतूक सेना-उपाध्यक्ष श्री.सुखदेव सस्ते,अखिल भारतीय केबल सेनेचे अध्यक्ष श्री.टोनी डिसोझा, शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्ष उपाध्यक्ष श्री.पंढरी पवार व इतर पदाधिकारी उपस्थित होते. राज्यातून सकपाळ यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# अल्ताफ शेख यांच्या आगामी चित्रपटात आशिकी फेम राहुल रॉय झळकणार

बीड । प्रतिनिधी



सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा बीड जिल्ह्याचे जावई आणि गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या पुणेला आपली कर्मभूमी बनविलेले हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीतील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध चित्रपट लेखक, दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार आणि अभिनेते असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले अल्ताफ दादासाहेब शेख यांनी आपल्या आगामी चित्रपटासाठी प्रचंड गाजलेल्या आशिकी या चित्रपटाचे मुख्य नायक असलेले अभिनेते राहुल रॉय यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत आगामी चित्रपट करण्याबद्दल बोलणे केले. यावर राहुल रॉय यांनी होकार दिला.

राहुल रॉय यांनी अल्ताफ शेख यांना अत्यंत आपुलकीने भेट देऊन बऱ्याच विषयांवर चर्चाही केली. शिवाय अल्ताफ शेख यांनी आतापर्यंत हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीत अनेक चित्रपटाचे दिग्दर्शक, लेखक, गीतकार, संगीतकार, अभिनेते म्हणून केलेले अष्टपैलू कार्य चांगले असल्याचे म्हटले. आगामी हिंदी चित्रपटात ही जोडी सोबत काम करणार आहे.


# आमदार अमोल मिटकरी यांचा सरकारवर हल्लाबोल!

# अजित दादा यांचे विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज जाहीर करण्याची मागणी

## दादांच्या मृत्यूमागे कट? अमोल मिटकरी यांचा गंभीर संशय

## सभागृहात चर्चा का नाही? याबाबत सरकारवर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी



**दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विधिमंडळात चर्चा करण्यात होत असलेल्या दिरंगाईवर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा अपघात होता की घातपात, याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र पहिल्याच अधिवेशनात या विषयावर चर्चा न होणे अत्यंत वेदनादायी व खेदजनक असल्याचे ते म्हणाले.**



मिटकरी यांनी स्पष्ट केले की, सभागृहात पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन किंवा अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून हा विषय मांडला जाऊ शकतो. त्या चर्चेतूनच सत्य समोर येईल आणि ते विधिमंडळाच्या नोंदवहीतही नोंदले जाईल. परंतु अद्यापपर्यंत या गंभीर प्रकरणावर चर्चा न होणे हे संशय अधिकच गडद करणारे असल्याची टीका त्यांनी केली. २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत अजित पवार यांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटातील काही आमदारांनीही याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यात विशेषतः रोहित पवार आणि अमोल मिटकरी यांनी सातत्याने चौकशीची मागणी करत तपास यंत्रणांवर दबाव वाढवला आहे.

शनिवारी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे मिटकरी यांनी पुन्हा एकदा या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेतली. डीजीसीएचा अंतिम अहवाल पुढच्या वर्षी दिलात तरी चालेल, पण निदान अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज तरी महाराष्ट्रासमोर आणा, अशी मागणी त्यांनी केली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये मुंबई पोलीस आणि सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टिगेशन (सीबीआय) यांनाही टॅग केले आहे.

मिटकरी यांनी तपास यंत्रणांवरही निशाणा साधत, २८ जानेवारीपासून आजपर्यंत अपघाताबाबत एकही ठोस पुरावा समोर आला नाही. एफआयआर नाही, सीसीटीव्ही फुटेज नाही, ब्लॅक बॉक्स जळाल्याचे सांगितले जाते. ही संपूर्ण तपास प्रक्रिया फेल ठरली आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार कोण, याबाबत जनतेला स्पष्ट उत्तर द्यावे, अशीही मागणी त्यांनी केली.

### मिटकरींचे थेट प्रश्न...

अजित पवार यांचा अपघात होता की घातपात.? विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज अजूनही का जाहीर झाले नाही? ब्लॅक बॉक्स डेटा उपलब्ध का नाही? तपास यंत्रणांनी एक महिन्यानंतरही ठोस पुरावा का दिला नाही.? या प्रकरणात आंतरराष्ट्रीय चौकशी का नाकारली? जनतेच्या मनातील शंका दूर करायच्या असतील तर सर्व पुरावे महाराष्ट्रासमोर आणावेत, अशी मागणी मिटकरी यांनी केली आहे.

### दादांचा एकही आमदार बोलेना....

अजितदादा पवार यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर घाट पाठवता संशय व्यक्त होत आहे. अनेक जण या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी करीत आहे. अजित दादा यांचे पुतणे आमदार रोहित पवार आणि अजितदादा पवार गटातील आमदार अमोल मिटकरी हेच याबाबत सातत्याने आवाज उठवीत असल्याचे दिसत आहेत. मात्र अजितदादा पवार यांच्या गटातील ४० आमदार तोंडाला कुलूप लावून गप्प बसले आहेत. ते सत्तेमध्ये आहेत, हे मान्य आहे मात्र किमान त्यांनी चौकशी करण्याची तर मागणी केली पाहिजे. चौकशी करण्याची मागणी करणे म्हणजे कोणावर आरोप करणे असे होत नाही. मात्र सगळीकडे शांतता पसरली आहे, दादांच्या अकाली जाण्याच्या बाबतीत जो संशय निर्माण झाला आहे त्याची साधी चौकशी करण्याची सुद्धा मागणी हे आमदार करताना दिसत नाहीत हे अत्यंत दुर्दैवाचे आहे, आणि अमोल मिटकरी यांनी नेमके याच्यावरच बोट ठेवले आहे.

# नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आणले तसेच जिल्हा परिषदेतही पाठवणार : बाबुराव पोटभरे

## बहुजन विकास मोर्चाचा संवाद मेळावा उत्साहात



माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन समाजाच्या हक्कांसाठी एकजूट होऊन लढा देण्याची गरज असून नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी ग्रामीण भागातील तरुणांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे नेते बाबुराव पोटभरे यांनी केले. दि. १५ रोजी माजलगाव येथे आयोजित बहुजन विकास मोर्चाच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे (नाना) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास बहुजन समाजातील नागरिक व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बाबुराव पोटभरे म्हणाले की, हा कार्यक्रम केवळ भोजनाचा नसून बहुजन समाजाच्या विचारांचा आणि संघटन बांधणीचा आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने वर्षातील ३६४ दिवस भारतीय संविधानाचे वाचन करावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहाने व नाचून साजरी करावी. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी संविधानाचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, सुरुवातीला अनेक प्रस्थापित विरोधकांना असे वाटत होते की बहुजन विकास मोर्चाचा एकही उमेदवार नगरपालिकेत निवडून येणार नाही. मात्र जनतेच्या विश्वासामुळे चार प्रतिनिधी विजयी झाले. हे चार वाघ नगरपालिकेत पोहोचले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

यावेळी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने नवनिर्वाचित पाच नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये वडवणीचे नगरसेवक बाबा वाघमारे तसेच माजलगावचे नगरसेवक अभिजीत (भैय्या) पोटभरे, सचिन जावळे, अशोक लांडगे आणि सदानंद (भैय्या) प्रधान यांचा सन्मान करण्यात आला. मेळाव्यात बहुजन समाजातील संघटन बळकट करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बहुजन विकास मोर्चाच्या वतीने आयोजित या संवाद मेळाव्यात माजलगावचे माजी उपनगराध्यक्ष कचरू तात्या खळगे यांनी बाबुराव पोटभरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बहुजन विकास मोर्चामध्ये प्रवेश केला. तसेच पत्रकार राजरतन डोंगरे, नासेर पठाण,यांच्यासह किरण डोंगरे, सत्यपाल खळगे, आतिश जाधव, संजय डोंगरे आदींसह हजारो कार्यकर्त्यांनी बहुजन विकास मोर्चामध्ये प्रवेश करून संघटनेला पाठिंबा जाहीर केला.

तसेच दि. २३ मार्च २०२६ रोजी श्रद्धेय डॉ.बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आरएसएस मुख्यालयावर काढण्यात येणाऱ्या मोर्चाला बहुजन विकास मोर्चाच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल पंडित यांनी केले, तर सूत्रसंचालन पत्रकार राजरतन डोंगरे व नवनाथ धाईजे यांनी केले. प्रसंगी विठ्ठल पंडित, विठ्ठल जाधव, सचिन डोंगरे, शेख बाबा, संभाजी शिंदे, शेख फेरोज, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मेळाव्यात विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून बहुजन समाजाच्या एकजुटीची गरज अधोरेखित केली.

# अंधाराचे साम्राज्य संपले; इप्पिली आणि व्यवहारेंनी शब्द पाळला!

## तक्रार केली १३ तारखेला, काम झाले १४ तारखेला; नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव!

बीड । प्रतिनिधी

शहरातील वार्ड क्रमांक १८, खासबाग भागातील लेंडी नाला पुलाजवळील बंद असलेल्या पथदिव्यांमुळे निर्माण झालेला अंधाराचे साम्राज्य अखेर दूर झाले आहे. स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीची अवघ्या २४ तासांत दखल घेत बीड नगरपालिकेच्या विद्युत विभागाने नवीन एलईडी दिवे बसवल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे. वार्ड क्रमांक १८ मधील खासबाग परिसरातून जाणाऱ्या लेंडी नाला पुलाजवळ तीन महत्त्वाच्या विद्युत खांबांवरील एलईडी लाईट गेल्या काही दिवसांपासून तांत्रिक बिघाडामुळे बंद होते. या मुख्य रस्त्यावर रात्रीच्या वेळी पूर्णपणे अंधार पसरत असल्याने वाहनधारक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत भीतीचे वातावरण होते.

या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी १३ मार्च २०२६ रोजी बीड नगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे धाव घेतली. त्यांनी विद्युत अभियंता उदय इप्पिली आणि विद्युत निरीक्षक दत्ता व्यवहारे यांची भेट घेऊन तोंडी तक्रार केली व या समस्येचे गांभीर्य लक्षात आणून दिले. प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. तक्रार प्राप्त होताच अभियंता उदय इप्पिली यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच १४ मार्च रोजी सकाळी नगरपालिकेच्या विद्युत पथकाने पुलाजवळील तिन्ही खांबांची दुरुस्ती करून त्या ठिकाणी नवीन उच्च क्षमतेचे एलईडी दिवे बसवले. यामुळे रस्ता पुन्हा प्रकाशमान झाला असून नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. अनेकदा सरकारी कामात विलंब होतो, असा अनुभव असतो. मात्र, विद्युत अभियंता आणि निरीक्षकांनी आमच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन एका दिवसात काम पूर्ण केले, हे कौतुकास्पद आहे.

**– स्थानिक नागरिक, वार्ड क्र. १८ खासबाग**



# बीड शहरात मोकाट जनावरं आणि कुत्र्यांचा वाढता त्रास

## तातडीने उपाययोजना करण्याची मागणी : फरोक शेख

बीड । प्रतिनिधी



बीड शहरात सध्या मोकाट जनावरं आणि भटक्या कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत चालला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांना रस्त्यावरून जाणे धोकादायक होत आहे. अनेक ठिकाणी कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत असून त्यामुळे अपघात आणि हल्ल्यांचा धोका वाढला आहे. नव्याने तयार झालेल्या मोठ्या हायवे रोडवरही मोकाट जनावरांमुळे लहान-मोठे अपघात होत असल्याच्या घटना समोर येत आहेत.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते फरोक शेख यांनी बीड नगरपालिकेकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शहरातील मोकाट जनावरं आणि कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. बीड नगरपालिकेने विशेष मोहीम राबवून भटक्या कुत्र्यांचे लसीकरण, निर्बीजिकरण तसेच मोकाट जनावरांना ताब्यात घेण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही त्यांनी केली. नागरिकांची सुरक्षितता आणि शहराची सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, असे आवाहनही फरोक शेख यांनी केले.

# अ‍ॅट्रासिटी कायद्याला धक्का लावण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही : विकास गायकवाड

गेवराई । प्रतिनिधी



अ‍ॅट्रोसिटी कायद्यांतर्गत होणारी तातडीची अटक थांबवून आधी चौकशी करण्याचा निर्णय घेतल्याचे विधान सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत केले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील अनुसूचित जाती आणि जमातींचे सुरक्षा कवच धोक्यात आले असून, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष या निर्णयाचा तीव्र निषेध करत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे आज संजय शिरसाट आमदार आणि मंत्री झाले, त्याच घटनेने दिलेल्या अधिकारांना नख लावण्याचा प्रयत्न करू नका, असा इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी दिला.

**दलितांवरील अत्याचारांना मोकळे**

रान देण्याचे हे एक कटकारस्थान आहे. विकास गायकवाड म्हणाले की, अ‍ॅट्रोसिटी कायदा हा मागासवर्गीयांवरील अन्यायाविरुद्धचा सर्वात मोठा आधार आहे. तातडीच्या अटकेची तरतूद शिथिल करणे म्हणजे गुन्हेगारांचे धाडस वाढवणे होय. आधीच राज्यात दलितांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढत असताना, अशा प्रकारचे बदल करून सरकार नेमकं कोणाचे संरक्षण करू पाहत आहे ? हा निर्णय म्हणजे दलित-बहुजन समाजाच्या पाठीत खंजीर खुपसण्यासारखे आहे. सुरक्षेची भीती: अटकेची तरतूद काढल्यास आरोपी पीडित कुटुंबावर दबाव आणू शकतात आणि पुरावे नष्ट करू शकतात, असे झाल्यास हा भारतीय संविधानाचा अपमान आहे संविधानाने दिलेल्या विशेष तरतुदींना 'गैरवापर' म्हणणे ही मानसिकता घातक आहे. तरी ट्रॉसिटी क्ट कायद्यात कसलाही बदल करू नये अन्यथा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल अशा इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे. या निवेदनात जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड, अरुण कांबळे, मिलिंद डोंगरे, खाजाभाई शेख, लक्ष्मण उमाप, आप्पासाहेब मस्के, हनीफ शेख इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# समाजकल्याण मंत्री संजय शिरसाठ यांच्या वक्तव्याचा दलित पँथरकडून जाहीर निषेध

बीड । प्रतिनिधी





अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा म्हणजेच Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act (अ‍ॅट्रोसिटी अ‍ॅक्ट) संदर्भात समाजकल्याण मंत्री संजय सिरसाट यांनी केलेल्या कथित गैरवक्तव्याचा दलित पँथर संघटनेने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. दलित, बहुजन समाजाच्या संरक्षणासाठी असलेला हा महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याबाबत चुकीची व समाजात संभ्रम निर्माण करणारी विधाने करणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे मत दलित पँथरचे बीड जिल्हाध्यक्ष धम्मानंद वाघमारे यांनी व्यक्त केले आहे.

धम्मानंद वाघमारे म्हणाले की, अनुसूचित जाती-जमातींवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act लागू केला आहे. अशा संवेदनशील कायद्याबाबत जबाबदार पदावर असलेल्या मंत्र्यांनी बेफिकीर वक्तव्य करणे योग्य नाही. यामुळे दलित समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजात चुकीचा संदेश जात आहे.

दलित पँथर संघटनेच्या वतीने मंत्री संजय सिरसाट यांनी केलेल्या वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात येत असून त्यांनी तात्काळ आपले वक्तव्य मागे घ्यावे व समाजाची माफी मागावी, अशी मागणी धम्मानंद वाघमारे यांनी केली आहे. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही दलित पँथर संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# तरुणांनी ठाणले तरच यशाचे शिखरावर पोहोचता येतो : गटनेते खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

अत्यंत जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर मोमीन मुजम्मिल यांनी घवघवीत यश संपादन करत बीड जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागात 'डेप्युटी इंजिनियर' (उपअभियंता) म्हणून बढती मिळवली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, नुकताच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गटनेतील खुर्शीद आलम साहेब यांनी त्यांचा भव्य सत्कार केला.या सत्कार समारंभाप्रसंगी मोमीन मुजम्मिल यांना पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी बीड नगरपरिषद चे गटनेते खुर्शीद आलम साहेब, नगरसेवक शेख अफसर, मसी भाई, प्रा.अझहर अन्सारी सर, प्रा.कलाम सर, मुख्याध्यापक अलीम सर, शेख मुजीब सर, शहेबाज आलम, सैय्यद जफर, समीर भाई, आवेज अन्सारी यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित नागरिक, मित्रपरिवार आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गटनेते खुर्शीद आलम म्हणाले की तरूणांनी ठानलेच की मी विषयावर यशस्वी होऊ शकतो तरच तो यशाचे शिखरावर पोहोचतो, मोमीन मुजम्मिल यांनी शून्यातून विश्व निर्माण करत हे पद मिळवल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले. हे यश केवळ माझे नसून माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद आणि मित्रांच्या मार्गदर्शनाचे फळ आहे. अशी प्रतिक्रिया मुजमील साहेबांनी व्यक्त केली.



प्रशासकीय सेवेत काम करताना जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्याला माझे प्राधान्य राहील, अशी भावना सुद्धा त्यांनी यावेळी व्यक्त केली.उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देताना सांगितले की, मुजम्मिल यांचे यश हे समाजातील इतर तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. जिद्द असेल तर कोणतीही गोष्ट साध्य करता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. हे कार्यक्रम मोमीन पुरा भागातील सरकारी दवाखाने समोर संपन्न झाले.

# शिक्षण अधिकाऱ्यांच्या आडमुठपणामुळे शिक्षकांची पेन्शन रखडली; सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात : सूर्यकांत जोगदंड

बीड । प्रतिनिधी



शासनाच्या स्पष्ट निर्देशानुसार सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन दर महिन्याच्या एक तारखेलाच वितरित करणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि आडमुठ्या कारभारामुळे अनेक शिक्षकांना अद्याप पेन्शन मिळालेली नाही. परिणामी जिल्ह्यातील वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेन्शनचे बजेट १८ फेब्रुवारी रोजी उपलब्ध झाले होते, मात्र प्रभारी शिक्षणाधिकारी श्रीमती कुवर यांच्या टेबलवर पेन्शनची फाईल तब्बल आठ दिवस पडून राहिली. या काळात संबंधित फाईलवर स्वाक्षरी करण्यात आली नसल्याने शिक्षकांची पेन्शन प्रक्रिया ठप्प झाली. याबाबत शिक्षकांनी विचारणा केली असता त्यांच्याशी अरेरावी केल्याचाही आरोप पुढे येत आहे.

या प्रकरणी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली असली, तरी अद्याप संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही किंवा त्यांचा पदभार काढण्यात आलेला नाही, अशी नाराजी शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, १६ मार्च उलटून गेला तरीही शिक्षकांची पेन्शन वितरित झालेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. एकीकडे शिक्षणाधिकारी विविध दौरे करत असताना दुसरीकडे सेवानिवृत्त शिक्षक मात्र आर्थिक विवंचनेत दिवस काढत आहेत. पेन्शन न मिळाल्यामुळे अनेक वयोवृद्ध शिक्षकांना औषधोपचार, बँकेचे हप्ते, घरगुती खर्च तसेच मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करण्याची कसरत करावी लागत आहे. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असल्याने ईदचा खर्चही वाढलेला असून त्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीबाबत कास्ट्राईब संघटना व इतर कर्मचारी संघटनांनी वरिष्ठांकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा सर्व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# गुढीपाडवा व रमजान ईद निमित्त धान्य वाटप करावे : मोहम्मद खमरोद्दीन

बीड । प्रतिनिधी



गुढीपाडवा व रमजान ईद या दोन्ही पवित्र सणा निमित्त स्वस्त धान्य दुकानात अन्न धान्याचा तुटवाळा होत असून या काळात स्वस्त धान्याचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष मोहम्मद खमरोद्दीन यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना छगन भुजबळ साहेब यांच्याकडे केली आहे.

मोहम्मद खमरोद्दीन यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाकडून मिळणाऱ्या धान्याची मदत ही गरिबांना आपल्या संसारातरीता फार महत्त्वाची आहे पूर्वी निवडणूक काळात स्वस्त धान्य दुकानातून गोरगरिबांना शिधा वाटपाचे किट धन्य दुकानातून गोरगरिबांना शिधा वाटपाचे किट वाटप करण्यात येत असतं शासनाने तेही बंद करण्यात आले आहे.

हिंदू व मुस्लिम बांधवांचे पवित्र सण गुढीपाडवा व रमजान ईद मार्च महिन्यात आले आहेत. त्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानात अद्याप धान्य पुरवठा शिध पत्रिका धारकांना करण्यात आलेला नाही कालपर्यंत मार्च महिन्याचे कोणत्याही प्रकारचे शिधा वाटपाचे वितरण सुरू झालेले नाही स्वस्त धान्य दुकानात शिधा वाटपाचे वितरण त्वरित करून नागरिकांना दिलासा देऊन त्यांचे सन आनंदाचे साजरे होतील असे नमूद करण्यात आले आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. ※वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com